दैनिक
भूमिसत्ता

दिनांक २९ ऑक्टोबर २०१३

# आझाद संस्थेतर्फे नवनिर्वाचित पहिल्या महिला सरपंचांचा सत्कार

औरंगाबाद (प्रतिनिधी) : आझाद अली शाह शिक्षण संस्था, खडकेश्वर, औरंगाबाद यांच्या वतिने बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील काळेगाव येथे नवनिर्वाचित पहिल्या मुस्लिम अल्पसंख्याक सरपंच रुकसाना बेगम व सरपंच पती तथा विजयाचे शिल्पकार सैयद इसाक यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेच्या अध्यक्षा सुरैया खान हे होत्या तर प्रमुख पाहूणे म्हणून संस्थेचे प्रशासकिय अधिकारी खान साजिद पाशा यावेळी उपस्थित होते.

सर्व प्रथम आलेल्या मान्यवरांचे विद्यार्थिनींनी गिताने स्वागत केले. त्यानंतर संस्थेच्या अध्यक्षा सुरैया खान यांनी नवनिर्वाचित सरपंच रुकसाना बेगम यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. सरपंच पती सैयद इसाक यांचा सत्कार संस्थेचे प्रशासकिय अधिकारी खन साजिद पाशा यांच्या हस्ते करण्यात आला.

यानंतर शेख इसाक यांनी आपल्या भाषणातून ग्रामिण भागातील राजकीय हालचाली कशा असतात, हे सांगूण त्यांना येणाऱ्या अडचणी विषयी माहिती दिली. त्यानंतर संस्थेचे प्रशासकिय अधिकारी साजिद पाशा यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना नागरीक शास्त्र, राज्य शास्त्र आणि स्थानिक स्वराज्य संस्था या विषयांची आठवण करून दिली. चांगले काम केल्याने चांगलेच फळ मिळते. सांगूण सैयद इसाक यांच्या चांगल्या कार्याचे पारितोषीक त्यांना मिळाल्यांचे सांगितले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शुभांगी कुलकर्णी तर आभार प्रदर्शन शेख आरीफ यांनी केले. कार्यक्रमासाठी मुकिम पटेल, वैशाली दाभाडे, रत्नमाला सुरडकर, सुरेखा पाटोळे, हुमेरा पठाण, ज्योती वानखेडे, वर्षा फड श्वेता पाटोळे, सोनम गंगावणे आदींनी परिश्रम घेतले.